International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.8 No.1 Sept – Oct 2020

# ना. भास्करराव जाधवांचे सहकार चळवळीतील योगदान

**डॉ. शशिकांत सुबराव संघराज**

*असोसिएट प्रोफेसर,*

*राज्यशास्त्र विभाग, डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज.*

महाराष्ट्राच्या सहकार चळवळीत कोल्हापूर जिल्ह्याला फार महत्त्वाचे स्थान किंबहुना कोल्हापूर हे महाराष्ट्रातील सहकार चळवळीचे माहेरघर आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये छत्रपती शाहू महाराजांनी याची पायाभरणी केली. सहकाराचे महत्व त्यांनी ओळखलेले होते. आधुनिक युगातील बदलांच्या पार्श्वभूमीवर कारागीरांनी व्यवसाय टिकविण्यासाठी त्यांच्यामध्ये सहकाराची जाणीव निर्माण करताना ते म्हणतात या काळात बहुजन समाजाच्या हाती सत्ता जात असल्याने ही आपली पुराणी पद्धत आपल्या उपयोगी पडणार नाही. सध्या राजाश्रयापेक्षा लोकाश्रयच विशेष श्रेयस्कर आहे. तसेच आता प्रत्येकाने निरनिराळे काम करण्याचे दिवस गेले. पुष्कळ लोकांनी आपली कुशलता, अकल, पैसा व अंगमेहनत एकत्र केली पाहिजे. म्हणजेच सहकार्य केले पाहिजे. पूर्वी फार तर एक कुटंब एका ठिकाणी काम करी येणारा नफा ज्या कुटुंबातील माणसास उपयोगी पडे. आता आपली ही कुटुंबाची व्याख्या पुष्कळ विस्तृत केली पाहीजे. १०/२०/५० कुटंबे या उद्योगधंद्याकरिता एक झाली पाहिजेत. त्यांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे वेतन मिळाले पाहिजे, होणारा नफाही वाटून मिळाला पाहिजे. यासाठी आपण सहकार्य करण्यास शिका. आपली सहकारी पतपेढी काढा. बहुजन समाजाच्या विकासासाठी सहकार हा उत्तम मार्ग आहे हे ओळखूनच छत्रपती शाहू महाराजांनी सहकारी पतपेढ्या काढण्याची आवश्यकता प्रतिपादलेली आहे. या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सहकार चळवळीतील ना. भास्करराव जाधवांच्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

**सहकार चळवळीचे संस्थानात बिजारोपन:**

सहकार चळवळीची सुरवातच शेतकऱ्यांची सावकाराच्या पाशातून मुक्तता करण्याच्या उद्देशाने झाली. शेतकऱ्यांची सावकाराकडून कशी नाडवणूक होते याचे विदारक चित्र फुलेंनी रेखाटले आहे. अडचणीत असलेल्या शेतकऱ्याला कर्ज देताना कर्जरोखे लिहून घेऊन व्याजाची कपात करून राहीलेली रक्कम त्याला दिली जाते. ब्राह्मण, मारवाडी सावकार नापतीच्या अक्षरशून्य शेतकऱ्यास सांगतात की, " सरकारी कायद्यामुळे तुम्हाला गहाणावर कर्जाऊ रूपये आम्हांस देता येत नाहीत. यास्तव तुम्ही जर आपली शेते आम्हांस खरेदी करून द्याल तर आम्ही तुम्हांस कर्ज देऊ व तुम्ही आमचे रूपयांची फेड केल्याबरोबर आम्ही तुमची शेते परत खरेदी करून तुमच्या ताब्यात देऊ" म्हणून शपथा घेऊन बोल्या मात्र करितात. परंतु या सोवळ्या व अहिंसक सावकारांपासून कुटंबवत्सल अज्ञानी भोळया शेतकऱ्यांची सावकार अक्षरशून्य शेतकऱ्यांस कर्ज देताना त्यांचे दुसरे नाना प्रकारचे नुकसान करितात .

***दिनकरराव जवळकर शेतकऱ्याच्या दयनीय अवस्थेबद्दल लिहतात-***

"हिंदूस्थान हा शेतकऱ्यांचा देश असूनही शेतकऱ्यांची परिस्थिती अतिशय केविलवाणी होती..... शेतकऱ्यांच्या या दयनीय अवस्थेला परकीय सरकार तर कारणीभूत आहेच पण देशातील सावकारवर्ग कारण आहे. जळवेप्रमाणे कसलाही आवाज न करता शेतकऱ्यांचे रक्त शोधून काढणारा 'सावका' हिंदी शेतकऱ्याच्या मानगुटीवर जो केंव्हा एकदा बसला तो अजूनही कायम आहे.

१९०४ साली भारतात सहकारविषयक कायदा समंत झाला. १९२१ पर्यंत तो प्रयोगिक स्वरूपातच होता. १९११ साली मुंबई ईलाख्यात पहिली सहकारी मध्यवर्ती बैंक स्थापन झाली. त्या कायद्याच्या आधारेच छत्रपती शाहूंनी १९१२-१३ साली सहकार विषयक धोरण कोल्हापूर राज्यात व जहागिरीत जारी केले. श्री. भास्करराव जाधव याच्यावर सहकारी विभागाच्या प्रमुखपदाची जादा जबाबदारी सोपविली. सहकारी सोसायट्या त्यावेळी बाल्यावस्थेत असताना संस्थानकडून त्यांनी निरनिराळ्या प्रकारची मदत दिली. १९१३ साली पहिल्या नागरी पतपेढीचा जन्म झाला.

**संस्थानातील पहिली सोसायटी:**

२४ मे १९९३ रोजी भास्करराव जाधवांनी अर्बन को - ऑप. सस्थानातील पहिली सहकारी संस्था स्थापन केली व त्यांच्याच सल्याने श्री. धोंडी कृष्णाजी मराठे या संस्थानातील मामलेदाराची को-ऑप. सोसायट्यांचा पहिला रजिस्ट्रार या सोसायटीचा पहिला रजिट्रार म्हणून नेमण्यात आले . या सोसायटीच्या स्थापनेबाबत गौरवउद्गार काढताना पी. सी. पाटील म्हणतात,

“The first society viz. The Kolhapur Urban Cooperative Society Ltd. (Now The Kolhapur Urban Coop . Bank) was registered on 24-5-1913. Mr. Bhaskarrao V. Jadhav was responsible in organising this society and he is thus the pioneer of the Cop operative movement in the State." दि. कोल्हापूर अर्बन को - ऑप सोसायटी लि. स्थापनेचा हेतू: छत्रपती शाहू महाराजांचे विश्वासू सल्लागार, संस्थानातील कार्यक्षम अधिकार भास्करराव जाधव १९०४ ते १९१८ पर्यंत नगरपालिकेचे सर्वाधिकारी म्हणून काम पहात होते. नगरपालिकेमध्ये काम करणाऱ्या सेवकांची सावकाराकडून कर्जबाजारीपणामले होणारी आर्थिक पिळवणूक त्यांनी जवळून पाहिली होती. त्यांची आर्थिक शोषणात मुक्तता करण्याच्या हेतूने भास्करराव जाधवांनी 'दि. कोल्हापूर अर्बन को - ऑप. सोसायटी लि. ची स्थापना केली. भास्करराव जाधव हे या सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष होते १३० सोसायटीला कचेरी नगरपालिकेच्या इमारतीमध्येच होती. सोसायटी स्थापनेचा हेत स्पष्ट करताना भास्करराव जाधव म्हणतात,-

"मजूर कारागीर लहान व पतीचे व्यापारी, कारकून, शेतकरी वगैरे सर्व दर्जाच्या व धंद्याच्या लोकांस थोड्याबहुत रकमेची जरूरी लागते. ती भागवणेकरिता कर्ज जबर व्याजाने काढावे लागते. त्यामुळे नफा व्याजात जाऊन धंदा उर्जित दशेस येत नाही. ही अडचण दूर व्हावी, व्यक्तिच्या फायद्याकडे न पाहता सार्वजनिक हिताकडे नजर देऊन एकजुटीने काम करणेची लोकांस सवय लागावी, त्यांची चालरीत व दानत सुधारून ते सद्वर्तनी व्हावेत, गरीब लोकांस थोडा थोडा संचय करणेची सवय होऊन त्यांची पत वाढावी बगैरे अनेक हेतू ही संस्था काढण्याचे आहेत."

नामदार भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सोसायटी स्थापनसाला सर्वसाधारण सभा २४ /५ /१९९३ रोजी कोल्हापूर नगरपालिकेच्या सभागृहात भरविण्यात आली. त्यामध्ये बाळकृष्ण गणेश

पंडित, लक्ष्मण अनंत बाडीकर, मोरेश्वर केशव वाणकर, बाळा कृष्ण कुंभार, गोविंदा बाळाजी कुंभार, आप्पा लाडजी बागवान, आण्णा सुभाना भंगी, जुमन रामलाल भंगी, कृष्ण बजापा माने, दामोदर पांडुरंग कुंभोजकर, हसन इब्राहिम रहिमतपूरकर, सदाशिव रामचंद्र कारखानिस, गोविंद रावजी साळोखे, लक्ष्मण गोविंद सातारकर, कानू निळू मेस्त्री, मारूती नरलिंगा चव्हाण असे १७ जण विविध जातीचे प्रवर्तक होते. सर्व जातीच्या लोकांना एकत्र करून भास्करराव जाधवांनी ही सोसायटी स्थापन केली. त्यातूनच त्यांचा सामाजिक जाणीव जागृतीचा विचार दिसून येतो.

१२ जून १९९३ रोजी भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली ७ जणांचे पहिले कार्यकारी मंडळ नेमण्यात आले ते पुढीलप्रमाणे.

कार्यकारी मंडळाचे सभासद-

१) भास्करराव विठोजी जाधव अध्यक्ष

२) बाळकृष्ण गणेश पंडीत.

३) सदाशिव रामचंद्र कारखानिस.

४) बाळा कृष्ण कुंभार,

५) गोविंद रावजी साळोखे.

६) कृष्ण बजापा माने.

७) गोविंद बाळाजी कुलकर्णी.

पहिल्या वर्षी १८१ लोकाना सभासद करून घेण्यात आले. त्यात १४ मागासलेले होते. यापैकी २० स्त्रिया कर्जदार सदस्य होत्या. त्यासाठी डिव्हिडंटही वाटण्यात आला. भारतात ऐतिहासिक काळापासून स्त्रियांचा दर्जा गौण होता. हिंदू धर्माने स्त्रियांवर अनेक बंधने लादली होती. पुरूषांपेक्षा तिला कनिष्ठ लेखुन तिचे सर्व प्रकारचे स्वातंत्र्य नाकारलेले होते. 'Women under primitive Buddhism' या संशोधनपर ग्रंथात होर्नर या ब्रिटीश संशोधिकेने लिहले आहे की, बौद्धकाळात परिवर्तन झाले. स्त्रियांना अधिक समतेचा उपभोग घेता आला. अधिक आदर आणि अधिकार जे आत्तापर्यंत कधीही स्त्रियांना मिळालेले नव्हते ते त्यांना मिळाले. या पार्श्वभूमीवर सोसायटीच्या प्रवर्तकांनी स्त्रियांना सभासद करून घेऊन त्यांना पुरूषांच्या बरोबरीने काम करण्याची संधी दिली ही एक मोठी सामाजिक क्रांती होती. दुर्बल लोकांच्या

उत्थानासाठी सुरू केलेल्या या सोसायटीतून एक रूपयाची कर्ज देण्याची सोय होती. एक रूपयाची कर्जे घेणाऱ्यांची संख्या ३५ तर २ रू. ची कर्ज घेणाऱ्यांची संख्या ७८ इतकी होती जवळ शिल्लक असेल त्या मानाने लहान लहान रकमा मागणाऱ्यांच्या गरजा भागवून शिलक राहिल्यास मोठ्या रकमेचे कर्ज दिले जात असे सोसायटीचे धोरण होते. पठाणांचे शे. २०० टक्के व्याज मुद्दल न मागण्याची पण व्याज न सोडण्याची प्रवत्ती. हातातील सोटा यामुळे कर्जदार गर्भगळीत होत. अशा गरजूना कर्ज देण्याची सोय सोसायटी मार्फत केलेली होती.

सुरवातीला संस्थेच्या कार्यकारी समितीत सात सभासद पुढे १९२१ ला ही नऊ इतकी झाली. पहिली सलग पाच वर्षे भास्करराव जाधवांनी संस्थेचे काम उत्कृष्टपणे पाहिले. महत्त्वाचा व नवीन त - हेचा जमाखर्च, सभेच्या कामकाजाची नोंद, तसेच मासिक आढावे यासारख्या गोष्टी त्यांनी स्वत: च पाहिल्या.

**सोसायटी इमारतीसाठी भास्करराव जाधवांचे प्रयत्न:**

भास्करराव जाधव नगरपालिकेचे सर्वाधिकारी असताना सोसायटीचे नगरपालिकेच्या इमारतीमध्येच होते. नगरपालिकेचे तत्कालीन अधिक्षक, दिलवाली यांनी कार्यालयीन जागेसंबंधी बऱ्याचवेळा कटकटी केल्यामुळे संस्थेला दुसरी जागा घेणे भाग पडले इमारतीची गरज ओळखून भास्करराव जाधवांनी ही गोष्ट छत्रपती शाहू महाराजांना लक्षात आणून दिली. महाराजांनी गरीब कर्जदारांना सोसायटीकडून होणारी मदत, त्यांची प्रगती पाहिली होती. अशा उपयुक्त संस्थेच्या जागेसाठी अडचण होऊ नये म्हणून गंगावेशमधील चार ब्लॉक संस्थेच्या इमारत बांधकामासाठी बक्षीस म्हणून दिले.

**सहकारी प्रशिक्षण संस्थेची स्थापना:**

सन १९९८ मध्ये मुंबई येथे सहकारी प्रशिक्षण संस्थेची स्थापना झाली . भास्करराव जाधवांनी या पार्श्वभूमीवर दि . १६ / ९ / १९१८ ते २५ / ९ / १९१८ या कालावधीकरिता को - ऑपरेटिव्ह सेक्रटरीचा ज्युनिअर ट्रेनिंग क्लास भरविला. या वर्गामध्ये सातारा , बेळगांव, औंध संस्थान , इचलकरंजी जहागिरी येथील १२३ सचिव प्रशिक्षणासाठी होते. सोसायट्यांचा कारभार व्यवस्थितपणे चालण्यासाठी तीन सभासदांची पर्यवेक्षक समिती स्थापन केली. भास्करराव जाधव या समितीचे अध्यक्ष होते . सचिवांना

सहकार कायदे, नियम, परिपत्रके, सहकारी संस्थेचे कामकाज पद्धती यांची परिपूर्ण माहिती व्हावी हा भास्करराव जाधवांचा प्रशिक्षण वर्ग घेण्याचा हेतू असल्याचे पहावयास मिळते

**को - ऑपरेटिव्ह सोसायटीचे रजिस्ट्रार म्हणून भास्करराव जाधवांनी केलेले काम:**

को- ऑप. सोसायटीचे रजिस्ट्रार म्हणून भास्करराव जाधवांनी अतिशय महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. ते म्हणतात, ‘‘कांही सोसायट्यामध्ये कागद पाहता त्यात कर्जाची नोंद ठेवताना प्रत्येकी वर्षास १ पासून नंबर देण्यात येत असतात असे दिसून आले, त्यामुळे मागील सालची बाकी एखादे कर्जाची राहीली असल्यास कर्ज नंबराचे बराबर त्याचे सालही लिहावे लागते. दरसाल नंबर बदलल्यापासून फायदा नसून अशी अडचण पैदा होते. "याकरिता चालू साल अखेर जितके नंबर होतील त्याचे पढील नंबर पुढील साली लिहण्याचे सुरू करावे या योगाने कागदचिटी बचत होईल व त्याचप्रमाणे कर्ज खाते व ठेवखाते यांस २/३ ओळीची जागा सोडून एक पानावर २/३ खाती लिहण्याची बहिबाट नजरेस येते व अशी कमी जागा राहिल्याने दरसाला खातेवाही नवी घालावी लागते यामुळे चुका होण्याचा संभवही बराच राहतो . यासाठी सुचना देण्यात येते की , प्रत्येक खात्यास निदान अर्धे पान सोडावे व प्रत्येक खात २ / ३/४/५ वर्ष त्याच पानावर लिहीत जावे. दरसालास नवीन खाते घालून मागील बाकी लिहण्याचा त्रास घेवून नये या प्रमाणे ठेव कर्ज खात्याची व्यवस्था ठेवावी. रजिस्ट्रार काम करित असताना सोसायट्यांच्या दप्तरांचा बारकाईने अभ्यास करून अनेक विधायक सुचना भास्करराव जाधवांनी केलेल्या दिसतात. रजिस्ट्रार म्हणून त्यांनी आपली भूमिका अतिशय कार्यक्षमपणे पार पाडलेली दिसून येते.

रजिस्टार म्हणून अनेक पतसंस्था त्यानी रजिस्टर केलेल्या दिसतात. एका नोटीसमध्ये ते म्हणतात, "सन १९९२ च्या को- ऑपरेटिव्ह सोसायटीच्या अ[illegible] २ च्या कलम ९ अन्वये बहिरेवाड़ी सहकारी पतपेढी अनलिमिटेड ही तारीख २९ मार्च १९२१ इ. रजिस्टर करण्यात आलेली आहे. भास्करराव जाधवांनी अशा अनेक संस्था रजिस्टर करून सहकार चळवळ गतीमान करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**भास्करराव जाधवांचे मुंबई प्रांत सहकार चळवळीतील योगदान:**

कोल्हापूर संस्थानमध्ये सहकाराचा पाया घालून सहकार चळवळ विस्तारीत करण्यासाठी भास्करराव जाधवांनी अथक परिश्रम घेतले. 'मर्चिंग कमिटी ऑफ बॉम्बे कंट्रोल को- ऑप. इन्स्टिट्यूटफचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले. सदर संस्थेची सुरवात ब्रिटिश जिल्हे आणि ईलाख्यातील राज्य येथे सहकाराचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी केली होती.

कोल्हापूर संस्थानच्या सेवेतून निवृत्त झाल्यानंतर ते मुंबई प्रांताच्या सहकारी चळवळीत अग्रभागी होते. १२ / १२ / १९२९ रोजी मुकुंदराव पाटलांना लिहलेल्या पत्रात ते म्हणतात. "सार्वजनिक कामात लक्ष जास्त घालावयाचे आहे . सहकारी पतपेढ्याचे काम जास्त करावे लागेल. "१९२८ साली मुंबई इलाख्याचे सहकार मंत्री झाल्यानंतर त्यांनी ईलाख्यातील अनके सहकारी संस्था, बँका यांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर विमायुक्त घरबांधणी, कर्ज योजना, कार्पोरेशन, सहकारी, आरोग्य विमा योजना या करिता मुंबई प्रांत को- ऑप. सोसायटी रजिस्ट्रारकडून सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ सल्लागार म्हणून त्यांना बोलविले गेले होते.

बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को - ऑप बँकेचे ते डायरेक्टर होते. को. ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटचे ते अध्यक्ष होते. मराठा एज्युकेशन को- ऑपरेटिव्ह सोसायटीचे संस्थापक होते. मुंबई मराठा मार्केट पीपल्स को- ऑप. बँकेची स्थापना त्या देखरेखीखाली झाली. इंटरनशिल बँक ऑफ इंडियाच्या मुंबई प्रांताच्या पहिल्या में मंडळाचे ते अध्यक्ष होते. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मुंबई प्रांताच्या संचालक मंडळावरही त्यांनी काम केले होते . विमा क्षेत्रातही त्यांनी भरीव कामगिरी केली मुंबईच्या मोशन पिक्चर सोसायटीचे ते अध्यक्ष होते. मुंबई प्रॉव्हिन्शियल को इन्स्टिट्यूटचे १९४२ पर्यंत अध्यक्ष होते. त्यांच्या कार्याचा गौरव करताना या अध्यक्ष श्री. जे . एस. मदन म्हणतात, संस्थेच्या रौप्यमहोत्सवा निमित्त कार्यकारी में ठरविले आहे की, आपल्याकडून संस्थेची अमोल सेवा झाली आहे. संस्थेस सम स्थितिप्रत आणण्यास आपली संस्थेवरील निष्ठा व मातेच्या भूमिकेतून घेतलेली काळजीच कारणीभूत आहे. त्याची दृश्य स्वरूपात दखल घेण्याचे ठरवून आपल्यास संस्थेचे मानद सभासदत्व देऊन आपल्या सहकार क्षेत्रातील अद्वितीय कामगिरीची नोंद घेण्याचे ठरविले आहे. आणि आपली मानद सभासद म्हणून नियुक्ती ता. १३/ ७/ १९४३ रोजी भरलेल्या रौप्यमहोत्सवात जाहीर करण्यात आली आहे. भास्करराव जाधवांनी सदर संस्थेची केलेली निष्ठापूर्वक सेवा

व त्यांची सहकार क्षेत्रातील कामगिरी याची ही पोचपावतीच होती. कोल्हापूर संस्थान बरोबरच मुंबई प्रांतातही सहकार चळवळ वृद्धींगत करण्यसाठी त्यांनी अथक प्रयत्न केलेले दिसतात.

**सहकार समितीचे चेअरमन म्हणून भास्करराव जाधवांचे काम:**

भास्कराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली रिजन्सी कौन्सिलने १९४२ मध्ये सहकार समिति नियुक्त केली. सदर समितीने आपला महत्त्वपूर्ण अहवाल १९४४ मध्ये सादर केला.

तत्कालीन सहकारी सोसावट्यांच्या कामाच्या पद्धतीची रूपरेषामध्ये कशा पद्धतीने सुधारणा करता येतील या संबंधीचे मार्ग सदर समितीने सुचविलेले दिसतात. सहकार समितीने सुचविलेल्या शिफारशींच्या परिणामामुळे कोल्हापूरमध्ये स्वतंत्र सहकार कायदा आला कोल्हापूर सहकार सोसायटी अ[illegible]अन्वये खालील नवीन उपक्रम सुचविले.

१) गाववार सहकारी सोसायट्यांची नोंदणी करावी, त्यातील सभासदांची जबाबदारी मर्यादित ठेवावी.
२) सदरच्या सहकार कायद्यान्वये अमर्यादित जबाबदारी मर्यादित करण्याची तरतुद असावी.
३) कोल्हापूर सहकारी कायदा १९४५ साठी नियम नियमावली तयार करावी व त्यात सभासदांना मदत करण्याची तरतूद असावी अशी मदत करण्यासाठी नकार नसावा.
४) सदर कायद्यामध्ये अभ्यासु व तज्ज्ञ सहकार समिती नियुक्त करावी म्हणजे सहकार कायद्याप्रमाणे कार्य चालेल.
५) सदर सहकारी सोसायटीमध्ये पगारदार नोकर सभासद असतील तर दर महिन्याच्या योग्य त्या कपाती करणे.
६) सभासदाला संस्था स्थापनेनंतर पाच वर्षांनी त्याचे अस्तित्व असेपर्यंत लाभांष द्यावा.
७) सदर सहकार कायद्यामद्धे जर सावकारी स्वरूपात संस्था चालत असतील तर त्याची नोंदणी आवश्यक आहे. उदा भिशी, मुस्तीफंड इ .
८) सहकार सोसायटीतून कर्ज घेतल्यानंतर त्याच्या वसुलीसाठी योग्य ती मालमत्त तारण म्हणून घ्यावी.

९) कोल्हापूर सहकार कायदा १९४५ मध्ये सभासद होताना एक किंवा दोन सहकार सोसायट्यांच्या सभासद होता येईल. ज्याप्रमाणे भारतीय कंपनी कायदा तरतुदीनुसार बँकांची नोंदणी होते व त्यात सभासद स्वीकारले जातात . जर अशा संस्था आपल्या जिल्हयात स्थापन केलेल्या असतील तर वरील नियम लागू होतील. वरील सहकाराबाबत सुचविलेल्या तरतुदींचा विचार करता भास्करराव जाधवांच्या सहकारातील गाढा अभ्यासाचा प्रत्यय येतो.

**सहकार चळवळीविषयी भास्करराव जाधवांचा विचार:**

२४ मे १ ९९ ३ रोजी अर्बन को - ऑप सोसावटी लि . ची स्थापना झाली . २४ में १९३८ रोजीच्या रौप्यमहोत्सवी समारंभात अध्यक्षीय भाषण करताना भास्करराव जाधव म्हणतात.

"सहकार चळवळ शक्य तितक्या आपल्या पायावर उभी रहावी हे चांगले. सरकारची सहानुभूती अवश्य पाहिजे; पण सरकारी पैशाची मदत फारशी नसावी. सढळ हाताने सरकारी मदत झाल्यास सोसायट्यांची स्थिती सुधारण्याऐवजी बिघडते मला अनुभव आहे."

सहकारी चळवळ भक्कम पायावर अधिष्ठीत राहण्याकरिता तीचे सरकारी मदतीवर अवलंबन असता कामा नये, असा विचार सहकार चळवळीला भास्करराव जाधव मांडताना दिसतात.

सहकाराचे तत्व सोप्या भाषेत समाजासमोर ठेवताना ते म्हणतात, मनुष्यप्राणी हा समाज स्थापन झाल्यापासून एकज राहू लागल्यापासून सहकाराची गरज त्याला भासू लागली. दुसऱ्याची मदत घेणे काही काही अवश्य भासू लागले. म्हणून आपणही दुसऱ्याच्या कामात मदत करणे जरूर झाले अशारीतीने दोन इसमांत सहकार सुरू झाल्यापासून त्याची प्रगती एका गावांतील सर्व माणसांशी सहकार्य करण्यापर्यंत पोचली गावात पाणी पिण्याची अडचण असल्यास सर्व गावाने अंगमेहनत करून बिहीर खोदण्याची कामे पुष्कळ झाली आहेत. अशा बिहीरीत साचलेला गाळ काढण्याचे कामी गावचे सर्व लोक वर्षातून एक अगर दोन दिवस झटत असतात हीच गोष्ट गावची तळी दुरूस्त करण्याच्या कामीही नजरेस येते. बिहीरीचा गाळ काढण्याचे कामी गावचा प्रत्येक घरचा माणूस झटत असतो. त्या प्रत्येकाचा उद्देश आपल्या घराला स्वच्छ पाणी मिळावे येथे एकेक व्यक्ति सर्व व्यक्तिकरिता झटत असते व गावचे सर्व लोक एका व्यक्तिच्या हिताकरिता झटत असतात. हेच सहकाराचे मुख्य तत्त्व आहे. भास्कररराव जाधव हे सहकामाचे गाढे

अभ्यासक होते. सावकारी पाशातून समाजाची मुक्तता करण्यासाठी त्यांनी सहकार चळवळीला प्रोत्साहन दिले. तळागळातील माणसाला सहकाऱ्याच्या माध्यमातून विकासाच्या वाटेवर नेण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. भास्करराव जाधव हे सहकार चळवळीतील अधारस्तंभ होते. सहकाराच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य व समाजाचा भौतिकविकास साधता येईल यावर त्यांचा विश्वास होता .

छत्रपती शाहू महाराजांनी रूजवलेल्या सहकारी संस्थांचा विचार कोल्हापूर व मुंबई प्रांतामध्ये विस्तारीत करण्यामध्ये भास्करराव जाधवांनी फार प्रयत्न केलेत. आज महाराष्ट्रामध्ये जे सहकाराचे जाळे निर्माण झालेले आहे त्याचे श्रेय भास्करराव जाधव यांना द्यावे लागेल.

**संदर्भ:**


१) दि कोल्हापूर अर्बन को - ऑप बँक लि सुवर्णमहोत्सवी स्मृती ग्रंथ १९६५.

२) कोल्हापूर संस्थान सर्वसाधारण प्रशासन अहवाल १९२०-२१

३) दि कोल्हापूर अर्बन को - ऑप सोसायटी लि. रौप्यमहोत्सवी अहवाल १९८१.

४) कोल्हापूर अ[illegible]मिनिस्ट्रेटीव्ह रिपोर्ट १९१८-१९.

५) करवीर सरकारचे म्याझिट १९ मार्च १९२९ रेकॉर्ड ऑफिस कोल्हापूर.

६) करवीर सरकारचे म्याझिट ९ एप्रिल १९२९ रेकॉर्ड ऑफिस कोल्हापूर.

७) औद्योगीक खास अंक ३० एप्रिल १९५०.

८) कडिवाळ रा. अ.ना. कै. भास्करराव जाधव यांचे जीवन व कार्य, इंदूमती प्रकाशन, कोल्हापूर १९९०.